आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२१ जुलै २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून / या पार्श्वभूमीवर सरकारनं घेतली सर्वपक्षीय बैठक, कोणत्याही मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी सरकार तयार असल्याची संसदीय कामकाज मंत्र्याची ग्वाही

- महाराष्ट्रात आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीला पूर्ण बहुमत मिळेल, असा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना विश्वास

- नेपाळच्या संसदेत प्रधानमंत्री के. पी. शर्मा ओली यांच्या सरकारचा विश्वासदर्शक ठराव दोन तृतियांश मतांनी मंजूर

- स्वीडिश ओपन टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीत राफेल नदालवर मात करत पोर्तुगालच्या नूनो बोर्शेशनं पटकावलं अजिंक्यपद

**आणि**

- महिला आशिया चषक टी- ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत भारताचा संयुक्त अरब अमिरातीवर ७८ धावांनी विजय

**<><><><><>**

महाराष्ट्रात आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीला पूर्ण बहुमत मिळेल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला आहे. ते आज पुण्यात भाजपाच्या महाअधिवेशनाच्या समारोप सत्रात बोलत होते. केंद्राकडून महाराष्ट्राला भरघोस निधी मिळाला, युती सरकारच्या काळात बरीच विकासकामं झाली, अनेक मोठे प्रकल्प राज्यात राबवले गेले, असं शहा म्हणाले. फक्त भाजपाच महान भारत

घडवू शकतो, असं ते म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यामुळे अयोध्येत राममंदिर उभं राहिलं, त्यांनी देशातला दहशतवाद कमी केला, असं सांगत त्यांनी महाविकास आघाडीतल्या तिन्ही पक्षांवर टीका केली. विरोधी पक्ष खोटा प्रचार करत असल्याचा आरोप शहा यांनी केला.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी विरोधी पक्षांनी राज्यघटना, महागाई आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत भाजपावर आरोप करत केलेला खोटा प्रचार पक्षनेते आणि कार्यकर्त्यांनी हा प्रचार खोडून काढायला हवा, असं मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या अधिवेशनात मांडलं. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून सुरू होणार आहे. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारनं आज दिल्लीत सर्वपक्षीय बैठक घेतली. सरकार कोणत्याही मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी तयार असून संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज सुरळीत चालावं ही सरकार आणि विरोधक दोघांची जबाबदारी असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीनंतर बातमीदारांशी बोलताना म्हटलं. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरळीत पार पडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावं, असं आवाहन त्यांनी केलं. केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, अर्जुन राम मेघवाल, जे पी नड्डा, चिराग पासवान, रामदास आठवले आणि काँग्रेस नेते जयराम रमेश, गौरव गोगोई, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल, द्रमुक नेते टी आर बाळू, तिरुची शिवा, आम आदमी पक्षाचे नेते संजय सिंह आणि AIMIM चे नेते असदुद्दीन ओवेसी या बैठकीला उपस्थित होते.

उद्यापासून सुरू होणाऱ्या या अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन मंगळवारी २०२४-२५ या वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प लोकसभेत सादर करतील. अधिवेशनादरम्यान सरकार सहा नवीन विधेयकं मांडण्याची शक्यता आहे.

<><><><>

नेपाळचे प्रधानमंत्री के. पी. शर्मा ओली यांनी हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हजमध्ये दोन तृतियांश मतांसह विश्वासदर्शक ठराव जिंकला आहे. सदनात हजर असलेल्या २६३ सदस्यांपैकी १८८ सदस्यांनी या ठरावाच्या बाजूनं मतदान केलं. ७४ मतं विरोधात गेली, तर एका सदस्यानं तटस्थ भूमिका घेतली. ओली यांची १४ जुलै रोजी तिसऱ्यांदा प्रधानमंत्रीपदावर नियुक्ती झाली होती.

<><><><>

स्वीडिश ओपन टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीत पोर्तुगालच्या नूनो बोर्शेश यानं अजिंक्यपद पटकावलं. त्यानं २२ वेळा ग्रँडस्लॅम अजिंक्यपद विजेत्या स्पेनच्या राफेल नदालचा ६-३, ६-२ असा सरळ सेट्समध्ये पराभव केला. ऑरलँडो लझ आणि राफेल मातोस या जोडीनं पुरुष दुहेरीचं विजेतेपद पटकावलं. ब्राझीलच्या या जोडीनं फ्रान्सच्या ग्रेगोयर जॅक आणि मॅन्युअल गुइनार्ड या जोडीवर ७-५, ६-४ असा सरळ सेट्समध्ये मात केली.

<><><><>

महिला आशिया चषक टी- ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज भारतानं संयुक्त अरब अमिरातीवर ७८ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित २० षटकात ५ गडी गमावून २०१ धावा केल्या. कर्णधार हरमनप्रीत कौरनं ६६, तर रिचा घोषनं २९ चेंडूत नाबाद ६४ धावा केल्या. शेफाली वर्मानं ३७ धावांचं योगदान दिलं.

भारताच्या धावसंख्येचा पाठलाग करतान संयुक्त अरब अमिरातीला निर्धारित २० षटकात ७ गडी गमावून १२३ धावाच करता आल्या. कवीशा एगोडेगनं सर्वाधिक नाबाद ४० धावा केल्या. कर्णधार ईशा रोहित ओझानं ३८ धावा केल्या. भारतातर्फे दिप्ती शर्मानं २, तर रेणूका ठाकूर, तनुजा कंवर, ओझा वस्त्रकार, आणि राघव यादव यांनी प्रत्येकी एक  बळी मिळवला.

या विजयामुळे गुणतालिकेत ४ गुणांसह भारत अग्रस्थानी असून, अ गटातला भारताचा शेवटचा सामना येत्या मंगळवारी नेपाळशी होणार आहे.

<><><><><>

यंदाच्या नीट यूजी परीक्षेत २३ लाखांहून अधिक विद्यार्थी बसले होते आणि त्यापैकी २ हजार ३२१ विद्यार्थ्यांनी ७०० किंवा त्याहून जास्त गुण मिळवले होते, अशी माहिती अधिकृत सूत्रांनी दिली आहे. २५ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशामधल्या २७६ शहरांमध्ये १ हजार ४०४ केंद्रांवर ही परीक्षा आयोजित करण्यात आली होती.

<><><><><>

राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांच्या फुटीनंतर, आमदार अपात्रेबाबत विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या विरोधात उद्धव ठाकरे गट आणि शरद पवार गटानं सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांवर येत्या मंगळवारी म्हणजेच २३ जुलैला सुनावणी होणार आहे. यासंदर्भात झालेल्या मागच्या सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयानं राहुल नार्वेकर यांना संबंधित दस्तऐवज सादर करण्याचे निर्देश दिले होते. या सुनावणीत हे दस्तऐवज सादर केले जाण्याची शक्यता आहे.

आमदार अपात्रतेबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटानंही विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

**<><><><><>**

राज्याच्या विविध भागात पावसानं आज जोरदार हजेरी लावली. अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं असून त्याच्या बातम्या आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांनी दिल्या आहेत.

**मुंबई** आणि उपनगरांत आज मुसळधार पावसानं अनेक ठिकाणी पाणी साचून वाहतूक कोंडी झाली. अंधेरी पूर्व आणि पश्चिम यांना जोडणारा अंधेरी सब वे, तसंच दादरच्या हिंदमाता भागात पाणी साचलं होतं. मुंबई आणि उपनगरांत गेल्या ४८ तासांपासून अधूनमधून जोरदार पाऊस पडत आहे. येत्या काही दिवसांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. गेल्या २४ तासांत मुंबईत ९१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली.

**नवी मुंबईत** दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ९१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. सकाळी वाशी नेरूळ, सानपाडा परिसरात साचलेलं पाणी आता ओसरलं असून जनजीवन पूर्वपदावर येत आहे. बेलापूर इथं डोंगरावर अडकलेल्या ६० हून अधिक पर्यटकांना, नेरूळ एमआयडीसी इथं अडकलेल्या एका नागरिकाला सुरक्षित बाहेर काढण्यात आलं.

**मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग** जिल्ह्यांना पुढच्या २४ तासांसाठी रेड अलर्ट दिला असून **ठाणे आणि कोल्हापूर** जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे.

**<><><><><>**

केदारनाथ पायी मार्गावर दरड कोसळल्यामुळे ३ भाविकांचा मृत्यू झाला तर ५ भाविक जखमी झाले आहेत. मृत भाविकांमध्ये जालना जिल्ह्यातल्या गोंदी

इथल्या सुनील महादेव काळे यांचा समावेश आहे. जिल्ह्यातले आणखी नऊ भाविक दुर्घटनाग्रस्त ठिकाणी आहेत. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन, आणि मंत्रालयीन नियंत्रण कक्ष हे रुद्रप्रयाग आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या संपर्कात असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली आहे. केदारनाथ यात्रा मार्गावर चिरबासाजवळच्या डोंगरावरून मोठे दगड आल्यानं काही यात्रेकरू ढिगाऱ्याखाली अडकल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली. एनडीआरएफ, डीडीआर, वायएमएफचे पथकाकडून बचावकार्य सुरू आहे.

**<><><><><>**

राज्यात अतिवृष्टीचा इशारा हवामानखात्यानं दिल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन, पोलिस, एसडीआरएफ, स्थानिक स्वराज्य संस्थांनी सतर्क रहावं अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. हवामानशास्त्र विभागाकडून मिळणाऱ्या इशाऱ्यांची माहिती वेळोवेळी जनतेला द्यावी, तसंच आपत्तीकाळात सर्वतोपरी मदत करावी, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं आहे.

**<><><><><>**

बांगलादेशात सरकारी नोकऱ्यांमध्ये सरकारनं जाहीर केलेलं बहुतांश आरक्षण सर्वोच्च न्यायालयानं रद्द केलं आहे. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर, १९७१च्या युद्धात लढलेल्या स्वातंत्र्यसेनानींच्या नातेवाईकांना सरकारी नोकऱ्यांमध्ये ३० टक्के नाही, तर ५ टक्केच जागा राखीव असतील. सन २०१८मध्ये प्रधानमंत्री शेख हसीना यांच्या सरकारनं आरक्षण व्यवस्था रद्दबातल ठरवली होती, मात्र कनिष्ठ न्यायालयानं गेल्या महिन्यात ती पुनर्स्थापित केल्यानंतर बांगलादेशात संघर्षाला तोंड फुटलं. ही व्यवस्था भेदभाव करणारी असल्याचा आरोप करत विद्यार्थी रस्त्यावर उतरले. या मुद्द्यावरून विद्यार्थी आणि

पोलिसांच्यात झालेल्या संघर्षात आत्तापर्यंत १००पेक्षा जास्त जणांनी जीव गमावला आहे.

**<><><><><>**

कोटा विरोधी आंदोलनानंतर बांग्लादेशात अडकलेले सुमारे ३१५ भारतीय विद्यार्थी आज त्रिपुरातल्या अगरतळामधल्या अखौरा चेकपोस्ट आणि सोनामपुरा जिल्ह्यातल्या श्रीमंतपूर येथून सुरक्षित मायदेशात परतले.

**<><><><><>**

जागतिक वारसा समितीचं ४६ वं अधिवेशन आजपासून नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं सुरू झालं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या अधिवेशनाचं उद्घाटन झालं.

**<><><><><>**

केरळमधल्या मल्लापुरम जिल्ह्यात निपाह संसर्ग झालेल्या मुलाचा आज सकाळी मृत्यू झाला. कोझिकोड वैद्यकीय महाविद्यालयात त्याच्यावर उपचार सुरु होते. पुण्यातल्या राष्ट्रीय विषाणूशास्त्र संस्थेनं केलेल्या चाचणीत, या मुलाला निपाह विषाणूचा संसर्ग झाल्याचं स्पष्ट झालं होत. या पार्श्वभूमीवर, रुग्ण संपर्काचा तपास, रुग्णाचं विलगीकरण यासारखे सार्वजनिक आरोग्य उपाय तातडीनं अमलात आणण्याचे निर्देश केंद्रानं केरळ सरकारला दिले आहेत.

**//<><><><><>//**